अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे उर्वरित देयक अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः **आयटी-२०१८/प्र.क्र.५०/मातंक**

बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ

फोर्ट,मुंबई-४००००१

तारीख: १६ जुलै, २०१९.

वाचा-

1) **ग्रामविकास विभाग शा.नि. क्र. आयटी-२०१८/ प्र.क्र.५०/ मातंक,दि. २८ मार्च, २०१९.**

प्रस्तावना-

राज्यातील ग्रामपंचायत क्षेत्रामधील अतिक्रमणे नियमित करण्यासाठी ग्रामविकास विभाग, शा.नि.क्र. प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/ योजना-१०, दि. १६/०२/२०१८अन्वये प्रशासकिय धोरण निश्चित करण्यात आले आहे. यानुसार नागरिकांना अतिक्रमणे नोंदविण्याची व नियमित करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करण्याची बाब नमुद आहे. विभागाच्या दिनांक ११/०७/२०१८ रोजी झालेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीमध्ये नागरिकांना अतिक्रमणे नोंदविण्याची व नियमित करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करण्यासाठी मे.सीएससी- एसपीव्ही या कंपनीचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. तसेच दि. १०.१०.२०१८ रोजी झालेल्या मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय बैठकीत रू. ५ कोटीच्या मर्यादेपर्यन्त देयक अदा करण्यास विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीने निर्णय घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये आता प्रमाणपत्र वितरण करण्यापर्यंत डेव्हलपमेंट पूर्ण झालेली आहे मे.सीएससी- एसपीव्ही या कंपनीने रू.१,६३,८६,८६०/- (अधिक कर) एकुण १,९३,३६,४९५/- इतक्या रकमेचे टॅक्स इनव्हाईस विभागास सादर केले आहे. त्यानुसार राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयास मे.सीएससी- एसपीव्ही या कंपनीचे देयक अदा करण्यासाठी यापूर्वी शासन निर्णय दि.२८/०३/२०१९ अन्वये रू. १,५८,५२,७३७/- इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऊर्वरित रू.३४,८३,७५८/- इतकी रक्कम उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

या विभागाच्या दिनांक ८/०३/२०१९ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीमध्ये मे.सीएससी- एसपीव्ही या कंपनीचे देयक ई-गव्हर्नन्स खाली उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. नागरिकांना अतिक्रमणे नोंदविण्याची व नियमित करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करण्याच्या प्रयोजनासाठीचे कंपनीचे देयक अदा करण्याकरिता

रू.३४,८३,७५८/- इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच सदर प्रदान करण्यास संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण,बेलापूर, नवी मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण,बेलापूर, नवी मुंबई यांनी सदर प्रदानासाठी संदर्भांकित दि. २८/०३/२०१९ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करावे.

२. सदर खर्च "मागणी क्रमांक एल-४ , लेखाशिर्ष ३४५१-सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा-(०१)(०३)- ई गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी १७ संगणक खर्च-(३४५१ २८०८) (योजनांतर्गत) (दत्तमत)" या लेखाशिर्षांतर्गत सन २०१९-२० मध्ये उपलब्ध झालेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदर रक्कम अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपसंचालक (संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण,बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालय (डीडीओ कोड १२०१००५१८३) यांना, आहरीत करण्यासाठी, उपलब्ध करण्यात येत आहेत.

३. सदरचा शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक: विअप्र- २०१३ /प्र.क्र.३० /२०१३ /विनियम, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्ठातील भाग पहिला, उपविभाग दोन, अनुक्रमांक २७-अ, नियम क्रमांक-७६, अन्वये तसेच सदर परिशिष्टातील भाग-पहिला, उप विभाग-चार, अनुक्रमांक-११, अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून व प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१६१४४५०६६५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2019.07.18 15:10:25 +05'30'

(प्रविण जैन)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर

२) उप सचिव,(रोखशाखा/ केंद्रिय योजना),ग्रामविकास विभाग, मंत्रालय.मुंबई.

३) संचालक, राज्य व्यवस्थापन प्रकल्प , ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर नवी मुंबई

४) कोषागार अधिकारी ठाणे /उप कोषागार अधिकारी,कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई

५) प्रकल्प सल्लागार, सी.एस.सी. ई गव्हर्नन्स सर्व्हिसेस इंडिया लि.ए ३०१, दालामल टॉवर,नरिमन पॉईंट, मुंबई

६) निवडनस्ती व बजेट नस्ती (माहिती तंत्रज्ञान कक्ष), ग्रामविकास विभाग, मंत्रालय.मुंबई